# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३२३/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. जगनसिंह राजपूत**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं-अतां-आस्था)**
महावितरण, ४ था मजला, प्रकाशगड, स्टेशनरोड,
बांद्रा (पूर्व) मुंबई-५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
महावितरण, ४ था मजला, प्रकाशगड, स्टेशनरोड,
बांद्रा (पूर्व) मुंबई - ५१

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०६.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १७.०६.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००३३२५ प्रकरणी आयोगाने दि.०८.०७.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महाव्यवस्थापक यांनी उपलब्ध माहिती संबंधीत कार्यालयाकडून प्राप्त करुन अपिलार्थींना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

२. उक्त आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांनी माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि. १३.०९.२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. २१.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा संचालक, सामान्य प्रशासन विभाग, महावितरण, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बांद्रा (पूर्व), मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं-अतां-आस्था), महावितरण, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बांद्रा (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगास दि. ११.११.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, आयोगाच्या आदेशानंतर दिवाळीनिमित्त सर्व शासकीय कार्यालयांना सुट्टी असल्यामुळे पुरेसे कर्मचारी वर्ग उपलब्ध नव्हते. त्यामुळे आयोगास दि. २७.१०.२०२२ रोजी कळविले की, तक्रारकर्ता यांना माहिती पुरविण्यासाठी काही वेळ लागेल व सदर पत्राची प्रत तक्रारकर्ता यांना दिलेली होती.

..२/-

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही सादर केले की, तक्रारकर्ता यांची मुळ माहिती अर्ज दि. २३.०१.२०१९ व ३१.१२.२०१८ रोजीची होती व तक्रारकर्ता यांनी माहिती देण्यात आली नाही असे नमुद करुन प्रथम अपील दाखल केले. तत्पूर्वी तक्रारकर्ता यांना दि. १६.०२.२०१९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली होती. आयोगाच्या आदेशानंतर पुन्हा सदर माहिती दि. ११.११.२०२२ रोजी संलग्न सहपत्रांसह आयोगास सादर केली व त्याची प्रत तक्रारकर्ता यांना देण्यात आलेली आहे.

५. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

सत्यमेव जयते

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२६**

25-6-2026
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**